## प्रेसनोट दि.०९/१२/२०१७

## सामाजिक सुरक्षा विभागाकडुन वेश्याव्यवसाय संबधी कॉल सेंटर उध्वस्त

सामाजिक सुरक्षा विभाग, गुन्हे शाखेस येरवडा पोलीस स्टेशन गुरनं. ७५७/२०१७ भादवि कलम ३७०,३७०(अ), इटपा ३,४,५ या गुन्ह्याच्या तपासा दरम्यान सामाजिक सुरक्षा विभागाकडील सपोनि शीतल भालेकर व पो.कर्मचारी सतिश ढोले यांना स.नं. ५०/९ महादेव नगर साईबाबा मंदिराजवळ विकास मुरकुटे यांची इमारत वडगाव शेरी पुणे १४ येथे वेश्याव्यवसाय संबधी कॉल सेंटर चालु असले बाबत मिळालेल्या माहीती नुसार दि.०८/१२/२०१७ रोजी अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष गुन्हे शाखा पुणे शहर चे पोलीस निरीक्षक श्री.संजय पाटील यांचे मार्गदर्शनाखाली सामाजिक सुरक्षा विभागाकडील अधिकारी व कर्मचारी यांनी खातरजमा करुन तेथे छापा टाकला असता सदर ठिकाणी दोन पुरुष व एक महिला असे एकुण १३ मोबाईल फोन्सद्वारे वेश्याव्यवसाय संबधाने संभाव्य गि-हाईके व मुलींचे एजंट यांच्याशी फोन कॉलिंग तसेच व्हॉट्सअप चाटींगद्वारे सातत्याने संपर्कात असल्याचे निदर्शनास आले. त्या बाबत अधिक पडताळणी करता त्यांचेकडील १३ पैकी १० मोबाईल फोन हे इंटरनेटवरील वेगवेगळ्या वेबसाईटसवर, कॉलगर्ल्स, एस्कॉर्ट सर्व्हिसेस इत्यादीच्या नावा खाली वेश्याव्यवसायाच्या जाहीरातीसाठी वापरण्यात येत असल्याचे तसेच याकामी महिलांचे नग्न व कामोत्तेजक फोटोंचा व तशा आशयाच्या मजकुराचा वापर करण्यात आला असल्याचे निष्पन्न झाले. या व्यतिरिक्त ग्राहकांनाही मोबाईल फोनद्वारे अश्लिल फोटो पाठविण्यात येत असल्याचे निदर्शनास आले. तेथे मिळुन आलेल्या महिलेकडे बनावट आधारकार्ड मिळुन आले.

त्यामुळे ग्राहक मिळविण्यासाठी विविध वेबसाईटसवर मोबाईल नंबर, अश्लिल फोटो, व मजकुर अपलोड करुन तसेच ग्राहकांना मुलीचे अश्लिल फोटो पुरवुन त्याद्वारे वेश्याव्यवसाय चालविणा-या आरोपी नामे १) अजय उर्फ रुद्रमुनी श्रीशैल्य हिरेमठ रा. उडचन्न ता.अफजलपुर जि.गुलबर्गा राज्य कर्नाटक २) श्रीकांत कालीदास तुळजापुरे वय २७ वर्षे रा. मु.पो.किणी ता.अक्कलकोट, जि.सोलापुर ३) सागर स्वामीनाथ अंबाडे, वय २४ वर्षे रा. सदर व महिला आरोपी नामे ४) संतोषणी कैलासचंद्र साहु वय २६ वर्षे रा.साईबाबा मंदिराजवळ महादेवनगर वडगाव शेरी पुणे ५) गणेश एंजट ६) प्रताप एजंट व इतर एजंट यांचे विरुध्द चंदननगर पोलीस स्टेशन येथे गुरनं.४१८/२०१७ भादवि कलम ४२०,४६८,४७१ सह माहीती तंत्रज्ञान कायदा कलम ६७ सह इटपा ॲक्ट क. ४ नुसार गुन्हा नोंद करण्यात आला आहे. तसेच अ.क्र.२ ते ४ यांना घटनास्थळावरुन ताब्यात घेण्यात आले आहे. पुढील तपास चंदननगर पोलीस स्टेशनकडे सुपुर्त केला आहे.

**वरील नमुद कारवाई ही मा.श्री.प्रदिप देशपांडे, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, मा.श्री.पंकज डहाणे, पोलीस उप आयुक्त, गुन्हे पुणे, मा.संजय निकम, सपोआ, गुन्हे-२, यांचे मार्गदर्शनाखाली पोनि श्री.संजय पाटील, सपोनि चंद्रकांत जाधव, सपोनि शीतल भालेकर, सतिश ढोले, नितिन तेलंगे, रेवनसिध्द नरोटे, सचिन शिंदे, प्रदिप शेलार, नितिन तरटे, यांनी व चंदननगर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. राजेंद्र मुळीक व स्टाफच्या संयुक्त पथकाने केली आहे.**